NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १५० व्या नियमित बैठकीचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि. १३ जानेवारी, २०२३ दुपारी ०५:१५ वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १५० वी बैठक शुक्रवार, दि.१३ जानेवारी, २०२३ रोजी दुपारी ०५:१५ वा. व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - कुलगुरु | अध्यक्षा | उपस्थित |
| २) | डॉ. राजेश गादेवार, प्र-कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. सिद्राम नारायण सलवदे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. अशोक उध्दव उबाळे<br>विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई नामनिर्देशित) | सदस्य | अनुपस्थित |
| ७) | डॉ. शैलेंद्र देवळाणकर,<br>मा. प्रभारी शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), पुणे | सदस्य | अनुपस्थित |
| ८) | डॉ. दत्तात्रय व्यंकटराव जाधव<br>मा. सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी,<br>विभागीय कार्यालय, शिवाजी नगर, पुणे. | सदस्य | अनुपस्थित |
| ९) | सीए श्रेणीक शाह - वित्त व लेखा अधिकारी (निमंत्रित) | निमंत्रित | उपस्थित |
| १०) | डॉ. शि. सु. गणपूर<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ (निमंत्रित) | निमंत्रित | उपस्थित |
| ११) | श्रीमती योगिनी घारे - कुलसचिव | सदस्य -सचिव | उपस्थित |

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले. तसेच नव्याने नामनिर्देशित झालेले मा.कुलपती नियुक्त सदस्य प्रा. दे. का. चिलवंत, प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य डॉ. शं. द. नवले, प्रभारी अधिष्ठाता डॉ. सि. ना. सलवदे यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा.कुलगुरु महोदया यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

विषय क्र.१ दि. ३० नोव्हेंबर, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १४९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

कुलसचिव यांनी दि. ३० नोव्हेंबर, २०२२ रोजी झालेल्या १४९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

वाचून दाखविला असता, सर्वानुमते खालील ठराव पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव | दि. ३० नोव्हेंबर, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १४९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला. |

**विषय क्र.२ सोलापूर विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर यांच्या कार्यालयास भाडेतत्वावर दिलेल्या जागेची पुढील ३ वर्षासाठी मुदत वाढवून देण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: सोलापूर विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर या संस्थेच्या कार्यालयास भाडेतत्वाचा कालावधी हा संपत आल्याने पुढील ३ वर्षासाठी कालावधी वाढवून मिळण्याबाबत विनंती केली आहे.

याबाबत सादर करण्यात येते की, व्यवस्थापन परिषदेच्या दि.०६ डिसेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत सदर कार्यालयास ३ वर्षासाठी रक्कम ₹५०/- इतक्या दराने भाडे तत्वावर जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार सोलापूर विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर या संस्थेने विद्यापीठास देण्यात आलेल्या जागेचे माहे ऑगस्ट, २०२२ या महिन्यापर्यंतचे पूर्ण भाडे भरणा केलेले आहे.

सबब, सोलापूर विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर या संस्थेच्या कार्यालयास भाडेतत्वावर पुढील ३ वर्षासाठी कालावधी वाढवून देण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **सोलापूर विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर यांच्या कार्यालयास भाडेतत्वावर दिलेल्या जागेची पुढील ३ वर्षासाठी नाममात्र ₹५० प्रती महिना दराने मुदत वाढवून देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.३** **प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११७ नुसार महाविद्यालयाचा किंवा मान्यता प्राप्त परिसंस्थेचा विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा दर्जा (Academic Standards and Standards of Academic Administration – AAA) निश्चित करण्यासाठीचे शुल्क आकारण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११७ मधील तरतुदीनुसार प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाचा किंवा मान्यता प्राप्त परिसंस्थेचा विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा दर्जा (Academic Standards and Standards of Academic Administration - AAA) ठरविण्यासाठी विद्यापीठाचे परिपत्रक क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२१/९१७३, दि.१६/१२/२०२१ व पुअहोसोविसो/संलग्नता/२०२१/९३७७, दि.३१/१२/२०२१ अन्वये सर्व संलग्नित महाविद्यालयांना पूर्व तयारी करिता कळविण्यात आले होते. सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारचे प्रस्ताव शुल्क अथवा प्रक्रिया शुल्क विद्यापीठाने स्विकारले नसल्याने महाविद्यालयनिहाय गठीत समितीच्या पत्रात समिती अध्यक्ष/सदस्यास महाविद्यालयांनी प्रवास भाडे व दैनिक भत्ता आदा करावा, असे कळविण्यात आले होते.

विद्यापीठाने गठीत केलेल्या समितीने महाविद्यालयास भेट देऊन महाविद्यालयनिहाय विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा दर्जा (Academic Standards and Standards of Academic Administration - AAA) अहवाल विद्यापीठास सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने समितीने संबंधित महाविद्यालयास दिलेली श्रेणी बाबत महाविद्यालयांकडून विचारणा होत आहे. त्याअनुषंगाने महाविद्यालयास प्रमाणपत्र द्यावे लागणार आहे. सदरील प्रमाणपत्र स्थानिक बाजारपेठेतून छपाई करुन घेणे कामी खर्च अपेक्षित आहे.

महाविद्यालयनिहाय सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारचे प्रस्ताव शुल्क अथवा प्रक्रिया शुल्क विद्यापीठाने स्विकारले नसल्याने प्रमाणपत्र करिताची प्रक्रिया शुल्क म्हणून काही रक्कम आकारावी लागणार आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११७ नुसार महाविद्यालयाचा किंवा मान्यता प्राप्त परिसंस्थेचा विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा दर्जा (Academic Standards and Standards of Academic Administration - AAA) निश्चित करण्यासाठीचे शुल्क आकारण्याची बाब विचारार्थ.

<table>
<tr><td>ठराव:</td><td>प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११७ नुसार महाविद्यालयाचा किंवा मान्यता प्राप्त परिसंस्थेचा विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा दर्जा (Academic Standards and Standards of Academic Administration – AAA) निश्चित करण्यासाठीचे शुल्क खालीलप्रमाणे सर्वानुमते मान्य करण्यात आले.<br>१) ज्यांचे (Academic Standards and Standards of Academic Administration - AAA) सद्य:स्थितीत पूर्ण झाले आहे त्यांना रु.१,०००/- शुल्क घेण्यात यावे.<br>२) यापुढे (Academic Standards and Standards of Academic Administration - AAA) करुन घेणाऱ्या महाविद्यालयांसाठी रु.२,०००/- शुल्क घेण्यात यावे.</td></tr>
</table>

**विषय क्र.४ विद्यापीठाचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी लेखा परीक्षकांच्या नियुक्तीची बाब विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १३५(२) नुसार व्यवस्थापन परिषदेने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकाकडून विद्यापीठाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करुन घेणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने दि.१५ फेब्रुवारी, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठराव क्र.११ अन्वये M/s. SKVM & Company यांची लेखापरीक्षक फी ₹१,२०,०००/- + १८% GST याप्रमाणे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी नियुक्ती करण्यात आली होती. सोबत नियुक्तीचे पत्र जोडले आहे.

M/s. SKVM & Company यांनी विद्यापीठाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे संवैधानिक लेखापरीक्षण वेळेत पूर्ण करुन तसा लेखापरीक्षण अहवाल या विभागाकडे सादर केला आहे. तसेच त्यांनी प्रस्तुत विद्यापीठाला आवश्कतेप्रमाणे वेळोवेळी विविध करारासंदर्भात मार्गदर्शन करुन विविध प्रकल्पाचे उपयोगिता प्रमाणपत्र ही वेळेत स्वाक्षरी करुन दिले आहे.

याबाबत सदर फर्मचे भागीदार CA Sachin S. Bhattad यांना सन २०२१-२२ या वर्षाप्रमाणे (अटी व शर्तीचे पालन करुन) सन २०२२-२३ चे लेखापरीक्षण करण्यासाठी पुर्ननियुक्तीबाबत विचारले असता, त्यांनी दि.०६ डिसेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये सन २०२२-२३ चे लेखापरीक्षण करण्यास संमती दिली आहे.

सबब, विद्यापीठाचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी संवैधानिक लेखापरीक्षक म्हणून M/s. SKVM & Company, CA Sachin S. Bhattad यांची लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **विद्यापीठाचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे संवैधनिक लेखापरिक्षण करण्यासाठी M/s. SKVM & Company, CA Sachin S. Bhattad यांची संवैधानिक लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यास व त्यासाठी ₹१,३५,०००/- + GST इतके लेखापरीक्षण शुल्क देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच M/s. SKVM & Company, CA Sachin S. Bhattad यांचेकडून GST ची कामे करुन घेण्यासाठी अधिकचे ₹३५,०००/- + GST ची रक्कम देण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.** |

विषय क्र.५ अंतर्गत तक्रार निवारण समितीवर रिक्त झालेल्या सदस्य या पदावर मा. कुलगुरु महोदयांनी डॉ. श्रीमती किर्ती ए. पांडे, प्राध्यापक, डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर यांचे नामनिर्देशन केल्याची बाब माहितीस्तव.

टिपणी: प्रस्तुत कार्यालयांच्या २८/१२/२०२० रोजीच्या परिपत्रकानुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांना व विद्यापीठातील सर्व संकुले व प्रशासकीय विभाग यांना कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ आणि विद्यापीठ अनुदान आयोग UGC (Prevention, Prohibition and Redressal of Sexual Harassment of Women Employees and Student in Higher Educational Institutious) Regulation, 2015 (In the Gazette of India dated 02 May, 2016) अन्वये विद्यापीठ स्तरावर अंतर्गत तक्रार निवारण समितीचे सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेअन्वये गठन केल्याचे कळविण्यात आले होते.

परंतू, सदर गठीत समितीतील सदस्या डॉ. श्रीमती एस. व्ही. राजमान्य, प्राचार्य, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर ह्या दि. ३१/१०/२०२२ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचे जागी मा. कुलगुरु महोदयांनी डॉ. श्रीमती किर्ती ए. पांडे, प्राध्यापक, डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर यांचे नामनिर्देशन केल्याची बाब माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | अंतर्गत तक्रार निवारण समितीवर रिक्त झालेल्या सदस्य या पदावर मा. कुलगुरु महोदयांनी डॉ. श्रीमती किर्ती ए. पांडे, प्राध्यापक, डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर यांचे नामनिर्देशन केल्याबाबतची नोंद घेण्यात आली. |

**विषय क्र.६ प्रस्तुत विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय विभाग व शैक्षणिक संकुल यांचे करिता कुरिअर सेवा देणे कामी न्युनतम दर असलेले फर्म मे. माऊली कुरिअर सर्व्हिसेस, सोलापूर यांना दरकरारानुसार पुरवठा आदेश देणे कामी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय विभाग व शैक्षणिक संकुल यांचे करिता कुरिअर सेवा देणेकामी न्युनतम दर असलेले मे. माऊली कुरिअर सर्व्हिसेस, सोलापूर यांना दरकरारानुसार खालील दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

| तपशील | दर सर्व करासहित पोहोच देणे (प्रत्येकी २०० ग्रॅमपर्यंत) | दर सर्व करासहित पोहोच देणे (प्रत्येकी २०० ग्रॅमच्या पुढील वजनासह) | टपाल पोहोचण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| सोलापूर शहर | २४ | १६ | २४ तास |
| संपूर्ण सोलापूर जिल्हा | ४३ | २२ | |
| संपूर्ण महाराष्ट्र | ४५ | २५ | २४ ते ४८ तास |
| आंतरराज्य | ५५ | २६ | ७६ ते ९६ तास |

उपरोक्त प्रमाणे टपाल सेवा पुरविण्याकामी दर व कालावधी ठरविण्यात आलेला असून दरकरार, पुरवठा आदेश, सुरक्षा ठेव स्विकारणे इत्यादी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तथापि, नजिकच्या कालावधीत व्यवस्थापन परिषदेची बैठक आयोजित नसल्याने मा. कुलगुरु महोदया यांचे अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता घेणे कामी दि.१६/१२/२०२२ रोजीची टिपणी सादर केली असता त्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार संबंधितांकडून दरकरार, सुरक्षा ठेव इत्यादी कार्यवाही करुन पुरवठा आदेश दिलेला आहे.

सबब, श्री. माऊली कुरिअर सर्व्हिसेस, सोलापूर यांना प्रस्तुत विद्यापीठातील कुरिअर सेवा देणे कामी मा. कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय विभाग व शैक्षणिक संकुल यांचे करिता कुरिअर सेवा देणे कामी न्युनतम दर असलेले फर्म मे. माऊली कुरिअर सर्व्हिसेस, सोलापूर यांना दरकरारानुसार पुरवठा आदेश देणे कामी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.७** **शासनाने दिनांक ०७/०१/२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षाचा बृहत आराखडा नवीन महाविद्यालये/परिसंस्थासाठी मंजूर करुन विद्यापीठास कळविले आहे. तसेच दिनांक १५/०१/२०२३ पूर्वी प्रस्ताव मागविण्याची कार्यवाही करावी असे निर्देशित केले आहे. सदरची तातडीची बाब विचारात घेऊन वेळेअभावी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनुसार मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.**

टिपणी: शासनाच्या दिनांक ०६/०७/२०२२ रोजीच्या शासन पत्राच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षाचा बृहत आराखडा तयार करुन शासनास दिनांक २६/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आला होता. सदर बृहत आराखड्यास शासनाने पत्र क्र. संकिर्ण २०२२/प्र.क्र.७०/वि.शि.५, दिनांक ०७/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी दिलेली आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९(३)(क) मधील तरतूद सुधारित करण्यात आली असल्याचे, नवीन महाविद्यालये/परिसंस्थासाठी मंजूर स्थळबिंदूना आवश्यकतेनुसार विद्यापीठ प्राधिकरणाची मान्यता घेण्याबाबत व त्यानुसार जाहिरात देऊन दि. १५ जानेवारी, २०२३ पूर्वी प्रस्ताव मागविण्याची कार्यवाही करणेबाबत निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९(३)(क) मधील तरतूदीनुसार उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरु करण्यासाठी इरादा पत्र मागणारे व्यवस्थापन, यावर्षी इरादापत्र मागवले असेल त्यावर्षाच्या अगोदरच्या वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी विद्यापीठाच्या कुलसचिवाकडे विहित नमुन्यात अर्ज करील, अशी तरतूद आहे. तथापि, शासनाने दिनांक ०७/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये दिनांक १५ जानेवारी, २०२३ पूर्वी प्रस्ताव मागविण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. सदरची तातडीची बाब लक्षात घेता, मा. कुलगुरु महोदयांची मान्यता घेऊन कार्यवाही करण्यात आली आहे.

सबब, शासनाने दिनांक ०७/०१/२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षाचा बृहत आराखडा नवीन महाविद्यालये/परिसंस्थासाठी मंजूर करुन विद्यापीठास कळविले आहे. तसेच दिनांक १५/०१/२०२३ पूर्वी प्रस्ताव मागविण्याची कार्यवाही करावी असे निर्देशित केले आहे. सदरची तातडीची बाब विचारात घेऊन वेळेअभावी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनुसार मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.

| ठराव: | **शासनाने दिनांक ०७/०१/२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षाचा बृहत आराखडा नवीन महाविद्यालये/परिसंस्थासाठी मंजूर करुन विद्यापीठास कळविले आहे. तसेच दिनांक १५/०१/२०२३ पूर्वी प्रस्ताव मागविण्याची कार्यवाही करावी असे निर्देशित केले आहे. सदरची तातडीची बाब विचारात घेऊन वेळेअभावी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनुसार मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची नोंद घेण्यात आली.** |
|---|---|

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय क्र.८ स्वायत्त (Autonomous) महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना प्रस्तुत विद्यापीठ गुणवत्ता यादी मध्ये समाविष्ठ करुन सुवर्णपदकासाठी ग्राह्य धरावे किंवा नाही याबाबत निर्णय घेणेकामी इतर विद्यापीठांकडून मागविण्यात आलेली माहिती विचारार्थ.**

टिपणी: स्वायत्त महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ठ करुन सुवर्णपदकासाठी ग्राह्य धरावे किंवा नाही याबाबत डॉ. चंद्रकांत चव्हाण, अधिसभा सदस्य यांनी दि.१५/०४/२०२२ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीसमोर "सोलापूर विद्यापीठाशी संलग्न असलेल्या स्वायत्त महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील इतर विद्यार्थ्यांप्रमाणेच त्यांच्या गुणांची दखल घेवून विद्यापीठाचे सुवर्णपदक देण्यात यावे, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे" असा प्रस्ताव सादर केला असता, त्यावर अधिसभेने सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र. १० | सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास डॉ. सुशिलकुमार शिंदे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाबाबत सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

उपरोक्त ठरावानुसार सदर बाब दि.१८/०७/२०२२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीसमोर सादर करण्यात आली होती. सदर बाबीवर व्यवस्थापन परिषदेने सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र. ३७ | सदरचा विषय सध्या अमान्य करण्यात आला. विद्यार्थी हित लक्षात घेता इतर विद्यापीठातून माहिती घेवून फेरविचार करावा असे ठरले. |

सदर ठरावाच्या अनुषंगाने अभ्यासमंडळे विभागाने विद्यापीठाचे जा.क्र. पुअहोसोविसो /अमंवि/२०२२/६१९४, दि.०८/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये व पुअहोसोविसो/अमंवि/२०२२/ ९२००, दिनांक ०१/१२/२०२२ रोजीच्या स्मरणपत्रान्वये सर्व अकृषि विद्यापीठांना त्यांच्या विद्यापीठामध्ये संलग्नित स्वायत्त महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ठ करुन सुवर्णपदकासाठी ग्राह्य धरता किंवा नाही, याबाबतची माहिती अनुषंगिक कागदपत्रासह/नियमावलीसह या विद्यापीठास पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते.

या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर या दोन विद्यापीठांची माहिती खालीलप्रमाणे प्राप्त झाली आहे.

| |
|---|
| सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ: Rank List बनवण्यासंदर्भात नियम व अटी मधील नियम क्र. ६ स्वायत्त महाविद्यालयांच्या Rank List विद्यापीठाकडून तयार करण्यात येवू नये. तसेच सदर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा Rank List मध्ये समावेश करु नये. |
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ: राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ स्वायत्त महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ गुणवत्ता यादीमध्ये ग्राहय धरण्यात येत नाही. |

सबब, स्वायत्त (Autonomous) महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना प्रस्तुत विद्यापीठ गुणवत्ता यादी मध्ये समाविष्ठ करुन सुवर्णपदकासाठी ग्राह्य धरावे किंवा नाही याबाबत निर्णय घेणेकामी इतर विद्यापीठांची उपरोक्त प्रमाणे प्राप्त माहिती व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **स्वायत्त (Autonomous) महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना प्रस्तुत विद्यापीठ गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ठ करुन सुवर्णपदकासाठी ग्राह्य धरणेबाबतचा प्रस्ताव सर्वानुमते अमान्य करण्यात आला.** |

विषय क्र.९ **श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी या महाविद्यालयाचा राष्ट्रीय कार्यशाळा प्रस्ताव Entitled "Recent Advances in Biological Conservation" आयोजनार्थ विद्यापीठाकडून आर्थिक सहाय्य मंजूर करणे कामी छाननी समितीच्या दिनांक २०/१२/२०२२ रोजीच्या बैठकीचा कार्यवृत्तात व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: अभ्यासमंडळे विभागाच्या दिनांक १६/१२/२०२२ रोजीच्या टिपणीवर मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता प्रदान केल्यानुसार श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी या महाविद्यालयाचा राष्ट्रीय कार्यशाळा प्रस्ताव Entitled "Recent Advances in Biological Conservation" आयोजनार्थ विद्यापीठाकडून आर्थिक सहाय्य मंजूर करणेकामी छाननी समितीची बैठक दि. २०/१२/२०२२ रोजी दु.३:०० वा. विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. सदर समितीने श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी यांच्या प्रस्तावाचा सर्वकष अभ्यास करुन सदर प्रस्तावास विद्यापीठाच्या निमावलीनुसार रु.२०,०००/- अनुदान मंजूर केले आहे. दि.२०/१२/२०२२ रोजीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत अवलोकनार्थ जोडला आहे.

सबब, श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी या महाविद्यालयाचा राष्ट्रीय कार्यशाळा प्रस्ताव Entitled "Recent Advances in Biological Conservation" आयोजनार्थ विद्यापीठाकडून आर्थिक सहाय्य मंजूर करणे कामी छाननी समितीच्या दि.२०/१२/२०२२ रोजीच्या बैठकीचा कार्यवृत्तात व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी या महाविद्यालयाचा राष्ट्रीय कार्यशाळा प्रस्ताव Entitled "Recent Advances in Biological Conservation" आयोजनार्थ विद्यापीठाकडून आर्थिक सहाय्य मंजूर करणे कामी गठीत केलेल्या छाननी समितीच्या दि.२०/१२/२०२२ रोजीच्या बैठकीतील कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.१०** **सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला संचलित विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयाच्या नावात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय, सांगोला असा बदल करण्याबाबत अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन मंजूरीकरिता शासनास शिफारस करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: मा. चिटणीस, सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला यांच्याकडून संस्थेचे संचलित विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयाच्या नावात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून खालीलप्रमाणे बदल करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला होता.

| संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे सद्य:स्थितीतील नाव | महाविद्यालयाच्या नावातील बदल |
|---|---|---|
| सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला, जि. सोलापूर. | विज्ञान महाविद्यालय, सांगोला, ता. सांगोला, जि.सोलापूर | डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय, सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर |

सदर प्रस्तावात संस्थेच्या दि.२८/०५/२०२२ रोजीच्या सर्वसामान्य मंडळाच्या बैठकीमध्ये संस्थेचे संचलित विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयाचे नाव बदलून डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय, सांगोला असे करणेविषयी सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला असल्याने महाविद्यालयाच्या नावात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून उपरोक्त प्रमाणे बदल करुन मिळण्याविषयी विनंती केलेली आहे. सोबत संस्थेच्या दि.२८/०५/२०२२ रोजीच्या सर्वसामान्य मंडळाच्या बैठकीतील महाविद्यालयाच्या नावातील बदलाबाबतचा ठराव क्र. ५(२) ची कारणापुरती नक्कल जोडली आहे.

महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याबाबतच्या प्राप्त प्रस्तावास प्रथमत: अधिष्ठाता मंडळ, व्यवस्थापन परिषद व तद्नंतर महाराष्ट्र शासनाची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

यास्तव सदर बाब दि.१०/०१/२०२३ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता, अधिष्ठाता मंडळाने ठराव क्र. ५ अन्वये सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला संचलित विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयाच्या नावात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय, सांगोला असा बदल करण्याची बाब स्विकारुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला संचलित विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयाच्या नावात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून डॉ.गणपतराव देशमुख महाविद्यालय, सांगोला असा बदल करण्याबाबत अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन मंजूरीकरिता शासनास शिफारस करण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला संचलित विज्ञान महाविद्यालय, सांगोला या महाविद्यालयाच्या नावात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून "डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय, सांगोला" असा बदल करण्याबाबत अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन मंजूरीकरिता शासनास शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| | |
|---|---|
| विषय क्र.११ | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (जे) नुसार, मा.कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाच्या प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा एक अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.** |
| | टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (जे) नुसार, मा.कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाच्या प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा एक अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन माहे दि. ०१ जुलै, २०२२ ते ३१ डिसेंबर, २०२२ या कालावधीतील मा.कुलसचिव यांनी सादर करावयाचा विद्यापीठाचा विकास कार्यक्रमांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर. |

| | |
|---|---|
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (जे) नुसार, कुलसचिव यांनी सादर केलेल्या विद्यापीठाच्या दि.०१ जुलै, २०२२ ते ३१ डिसेंबर, २०२२ या कालावधीतील सहा महिन्यांच्या विकास कार्यक्रमांच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.१२** **दयानंद इन्स्टिट्युट, सोलापूर या संस्थेच्या अंतर्गत असलेले डी. ए. व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील नियमित प्राचार्याच्या नियुक्तीसंदर्भात विद्यापीठामध्ये झालेल्या दि.१७/१२/२०२२ रोजीच्या सुनावणी अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: सदर संस्थेच्या अंतर्गत असलेल्या डी. ए. व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील नियमित प्राचार्य पद भरतीसंदर्भात प्रस्तुत विद्यापीठाच्या दि.१८/११/२०२२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या ठराव क्र. ०२ च्या अनुषंगाने १ ते ६ मुददयासंदर्भात विद्यापीठामध्ये दि.१७/१२/२०२२ रोजी संस्थेचे स्थानिक सचिव सुनावणीस समक्ष उपस्थित होते. त्यानुसार खालील मुद्यासंदर्भात सुनावणी झालेली आहे.

१. दयानंद इन्स्टिटयुट, सोलापूर यांचे कडून यापुढे अशा प्रकारच्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही व विद्यापीठाच्या सर्व पत्रांवर तात्काळ कार्यवाही करण्यात येईल असे हमीपत्र घेण्यात यावे.

२. सन-२०२२-२३ पासून सदर महाविद्यालयास तीन वर्षे प्रवेश क्षमतेपेक्षा वाढीव विद्यार्थी संख्या देण्यात येवू नये. तसेच नवीन विषय, अभ्यासक्रम, अतिरिक्त तुकडी इ. देण्यात येवू नये.

३. विद्यापीठाकडून सदर महाविद्यालयास पुढील तीन वर्षे कोणतेही अनुदान (उदा. Seminar/conference/seed money) देण्यात येवू नये व इतर प्रकल्प (project) मंजूर करण्यात येवू नये.

४. महाविद्यालयाने कोणत्याही प्रकरणाबाबत विद्यापीठाची समाजात बदनामी होणार नाही याची दक्षता घ्यावी.

५. संस्थेने त्यांच्या कला व विज्ञान महाविद्यालय आणि वाणिज्य महाविद्यालयातील प्राचार्य पद भरतीबाबत बिंदूनामावली तपासणी, जाहिरात मान्यता याबाबत आजपावेतो काय कार्यवाही करण्यात आली आहे. याचा अहवाल तात्काळ विद्यापीठास सादर करावा.

६. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार महाविद्यालयाने प्राचार्य पद भरण्याबाबत कार्यवाही न केल्यामुळे आणि विद्यापीठास

योग्य तऱ्हेने प्रतिसाद देण्यास अतिविलंब केल्यामुळे संस्थेकडून रु. ५,००,०००/- इतका द्रव्यदंड का आकारण्यात येवू नये याबाबत विचारणा करून त्याबाबतची सुनावणी तात्काळ घेवून मा. कुलगुरु महोदयानी निर्णय घ्यावा, या मुददयांच्या अनुषंगाने संस्थेने खालील प्रमाणे त्यांचे म्हणणे सादर केले आहे.

The statement made by my representative on above points on 22nd November, 2022, I fully endorse it. There is no justification in slapping a fine of Rs.5,00,000/- on Dayanand Institutions, Solapur as we have fully refuted the alleged charges, because they are unfounded, baseless and without any evidence. Whatever statements my representative and I have made are factually correct.

I, therefore make a submission that all alleged charges be withdrawn and the long pending approvals be granted so that the Dayanand Institutions should be able to fulfill the Vision and Mission of Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University. If Dayanand Institutions grow, consequently the University would grow.

सबब, दयानंद इन्स्टिटयुट, सोलापूर या संस्थेच्या अंतर्गत असलेले डी. ए. व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील नियमित प्राचार्याच्या नियुक्तीकरीता उक्त मुददयासंदर्भात संस्थेच्या स्थानिक सचिवांनी विद्यापीठाकडे त्यांचे म्हणणे सादर केले आहे. सोबत पत्र जोडले आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | दयानंद इन्स्टिट्युट, सोलापूर या संस्थेच्या अंतर्गत असलेले डी. ए. व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील नियमित प्राचार्याच्या नियुक्तीसंदर्भात विद्यापीठामध्ये झालेल्या सुनावणी अहवालाच्या अनुषंगाने वस्तुस्थिती / सत्यता पडताळणी करण्यासाठी खालीलप्रमाणे त्रिसस्यीय समिती नेमण्यात आली.<br>१) डॉ. सिद्राम सलवदे - अध्यक्ष<br>२) प्राचार्य डॉ. शंकर नवले - सदस्य<br>३) सीए श्रेणिक शाह - सदस्य<br>या ठरावाबाबत प्रा. देवानंद चिलवंत यांनी भिन्न (Dissent) नोंद केला आहे. |

**विषय क्र.१३** **अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर कार्यालयाने तयार केलेली उत्तरे व सदरची उत्तरे अधिसभेच्या बैठकीत देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: अधिसभा सदस्यांनी अधिसभेच्या बैठकीकरिता प्रश्न पाठविलेले आहेत. सदर प्रश्नांची उत्तरे कार्यालयाने तयार केलेली आहेत. २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र. ६ (१३) नुसार, व्यवस्थापन परिषद अधिसभेच्या बैठकीत त्यांना द्यावयाची उत्तरे तयार करील.

सबब, अधिसभेच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची कार्यालयाने तयार केलेली उत्तरे विचारार्थ व सदर प्रश्नांची उत्तरे अधिसभेच्या बैठकीत देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **सोबत जोडल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे निश्चित करण्यात आली व अधिसभेमध्ये या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.** |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

# प्रश्नोत्तरे

## अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर विद्यापीठ प्रशासनाने तयार केलेली उत्तरे

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| **श्री. अजितकुमार बापुराव संगवे** | | **प्राचार्य डॉ. शिवाकुमार सुगण्णा गणपूर** |
| १ | विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांना परीक्षेत अपूर्णांकात ३१.५ असे गुण झाले असतील तर पुर्णांकात ३२ गुण होतात हे बरोबर आहे का? | होय. |
| २ | अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत जेवढे क्रीडा प्रकार आहेत त्या सर्व क्रीडा प्रकारच्या स्पर्धा आपण महाविद्यालयीन स्तरावर घेतो का? | नाही. |
| **श्री. अजिंक्य देशमुख** | | **सीए श्रेणिक हुकुमचंद शाह** |
| ३ | अधिष्ठाता सायन्य ॲन्ड टेक्नॉलॉजी यांची नेमणूक कोणत्या निकषाच्या व नियमाच्या आधारे केली गेली आहे? | प्रस्तूत विद्यापीठामध्ये अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा या नियमित पदावर कोणत्याही उमेदवाराची नेमणूक करण्यात आलेली नाही. |
| ४ | इंजिनिअरींग अभ्यासक्रमामध्ये M.Tech. पदवीच्या त्याप्रमाणे Ph.D. साठी देखील प्रोजेक्ट Viva Exam तसेच थेसीससाठी, अंतर्गत परीक्षक, मार्गदर्शक व बहिस्थ परीक्षक या सर्वासाठी काय आर्थिक तरतूदी आहेत व त्याला त्याचा परीक्षण मोबदला दिला जातो काय? | १) संशोधन विभागाकडे M.Tech. पदवीचे संशोधन व मान्यता समितीद्वारे केवळ Synopsis title मान्य (approval) केले जातात. त्याचे परीक्षण संशोधन विभागामार्फत केले जात नाही.<br>२) पीएच. डी. करीता Project Viva Exam घेतली जात नाही. तथापि, Viva Exam (मौखीक) घेतली जाते. त्याकरिता अंतर्गत परीक्षक, मार्गदर्शक व बहिस्थ परीक्षक यांना प्रत्येकी रु.१,०००/- प्रमाणे मानधन अदा केले जाते.<br>३) Ph. D. Thesis चे परीक्षण संशोधन विभागाकडून अंतर्गत परीक्षक, मार्गदर्शक व बहिस्थ परीक्षक यांच्याकडून केले जाते व त्यांना प्रत्येकी रु.२,०००/- इतके मानधन अदा केले जाते.<br>४) याकरिता संशोधन विभागाकडील आर्थिक अंदाजपत्रकामध्ये सन २०२२-२३ करीता रु.१२,००,०००/- (सुधारीत रु.१०,५०,०००/-) इतकी तरतूद करण्यात आली आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह |
| ५ | प्रस्तुत विद्यापीठाच्या नवीन प्रशासकीय इमारतीवर झालेल्या खर्चाचा तपशील काय आहे? | नवीन प्रशासकीय इमारतीवर दि.३१ मार्च, २०२२ पर्यंत रुपये १८,३०,३८,१५२/- इतका खर्च झालेला आहे. |
| ६ | नवीन प्रशासकीय इमारतीसाठी इलेक्ट्रीफिकेशनसाठी मंजुर करण्यात आलेला एकूण खर्चाचा तपशील काय आहे? | नवीन प्रशासकीय इमारतीसाठी इलेक्ट्रीफिकेशनसाठी अद्यापपर्यंत खर्च झालेला नाही. |
| श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर | | प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले |
| ७ | शैक्षणिक वर्षात २०१६-१७ मध्ये शिक्षकेत्तर कर्मचारी भरतीसाठी २८ उमेदवारांची गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात आली होती. ०२/०६/२०१५ च्या शासन निर्णय आदेशाप्रमाणे कोणतीही भरती करण्यापूर्वी प्रसिध्द झालेली यादी ६ महिन्यानंतर बाद होते. तरी देखील ऑगस्ट, २०१८ मध्ये २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रसिध्द केलेल्या यादीमधून काही कर्मचाऱ्यांना सेवेत रुजू करुन घेण्यात आले आणि हे कर्मचारी अजूनही आपल्या पदावर कार्यरत आहेत. कुठल्या शासन निर्णयाच्या आधार घेवून यांची नेमणूक करण्यात आली? | सन २०१६-१७ मध्ये प्रसिध्द केलेल्या यादीमधील खुला (समांतर आरक्षण महिला) व खुला (समांतर आरक्षण माजी सैनिक) च्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांच्या नॉन क्रिमिलेअर या प्रमाणपत्राची पडताळणी महिला व बाल विकास विभागाच्या दि.२५/०५/२००१ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरुन व माजी सैनिक प्रमाणपत्र पडताळणी बाबतच्या शासन निर्णयाच्या आधारे माजी सैनिक प्रमाणपत्र पडताळणी करण्यात आलेली आहे. सदर पळताळणी सन २०१८ मध्ये संबंधित कार्यालयाकडून प्राप्त झाल्याने निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश सन २०१८ मध्ये देण्यात आलेले आहेत.<br>तसेच शासनाने सदर भरती प्रक्रियेत निवड झालेल्या व नियुक्ती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती करण्यास कोणतीही अडचण नसल्याचे दि.१०/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. |
| ॲड निता सुरेशबाबू मंकणी | | प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले |
| ८ | ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२२ या कालावधीत विद्यापीठातील ४४ शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सहसंचालकाच्या मंजुरीनुसार विद्यापीठ फंडातून रुपये २५ लाख वैद्यकीय परतावा (Medical Reimbursement) या स्वरुपात देण्यात आले. वस्तुत: ही रक्कम शासनाकडून प्राप्त झाल्यानंतर कर्मचाऱ्यांना दिली जाते परंतु ही रक्कम अद्याप शासनाकडून प्राप्त झालेली नसतानाही विद्यापीठाने कोणत्या अधिकारातून विद्यापीठ फंडाचा वापर केला? | विद्यापीठाच्या दि.१३/१२/२०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेतील विषय क्रमांक ४०(६) ला अनुसरुन करण्यात आलेल्या ठरावास अनुसरुन कार्यवाही करण्यात आली आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| सौ. वर्षाराणी कामूर्ती | | डॉ. सिद्राम नारायण सलवदे |
| ९ | Public Relation Council of India द्वारे दिला जाणारा Best Communication School of Year पुरस्कार विद्यापीठाच्या School of Social Science या विभागाला मिळाला होता. याचा वितरण सोहळा कोलकत्ता येथे संपन्न झाला. अशा प्रकारचे पुरस्कार स्विकारायला जाण्यासाठीचे निकष कोणते? | Public Relation Council of India द्वारे दिला जाणारा Best Communication School of Year पुरस्कार वितरण सोहळा कोलकत्ता येथे संपन्न झाला, सदर अशा प्रकारचे पुरस्कार स्विकारायला जाण्यासाठीचे कोणतेही निकष नाहीत. |
| १० | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये एकूण किती पुरस्कार विद्यापीठाला मिळाले व ते स्विकारण्यासाठी आलेला एकूण खर्च किती? सदरचा खर्च कोणत्या फंडातून करण्यात आला? | शै. वर्ष २०२१-२२ मध्ये विद्यापीठाला मिळालेल्या पुरस्कारा संबंधीची माहिती पुढीलप्रमाणे.<br>1) UI Green Award Metric Internation University Ranking & ATAL RANK 8th Green Campus:<br>UNIVERSITIES INONESIA यांच्यामार्फत प्रस्तूत विद्यापीठास (भूशास्त्र संकुलास) दि.०७/१२/२०२२ रोजी "UI Green Award Metric Intenation University Ranking & ATAL RANK 8th Green Campus" पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार स्वीकारण्यासाठी खर्च आलेला नाही.<br>2) Sumit of leaders, Oxford:<br>शै. वर्ष २०२१-२२ मध्ये "Sumit of Leaders, Oxford" The Academic Union, Oxford, UK हा पुरस्कार प्रदान करण्यात आला असून, सदर पुरस्कार स्वीकारण्यासाठी खर्च आलेले नाही.<br>3) "Best Communication School of the Year":<br>प्रस्तूत विद्यापीठ सामाजिकशास्त्रे संकुलास दि.११ नोव्हेंबर, २०२२ (कोलकत्ता, पश्चिम बंगाल) रोजी Public Relation Council of India यांचेमार्फत "Best Communication School of the Year" हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.<br>सदर पुरस्कार स्विकारण्यासाठी "Faculty Transport Official" या अंदाजपत्रकीय तरतूदीतून रक्कम रु.५३,१३६/- इतका खर्च आलेला आहे.<br>(सोबत: सुलभ संदर्भासाठी संबंधीत विभागाकडून प्राप्त झालेल्या अनुषंगिक दस्तऐवजाच्या छायांकित प्रती सहपत्र १ ते २५ जोडले आहे.) |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| डॉ. विरभद्र चनबस दंडे | | प्राचार्य डॉ. शिवाकुमार सुगण्णा गणपूर |
| ११ | CAS अंतर्गत पदोन्नतीसाठी संबंधित महाविद्यालयाकडून विद्यापीठास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर किती दिवसात त्यावर कार्यवाही होणे अपेक्षित आहे? | CAS अंतर्गत पदोन्नतीसाठी संबंधीत महाविद्यालयाकडून विद्यापीठास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर ही कायम चालू राहणारी प्रक्रिया आहे. |
| १२ | विद्यापीठा अंतर्गत सर्व व्यावसायिक महाविद्यालयातील प्राध्यापक जसे की अभियांत्रिकी, फार्मसी, ऑर्किटेक्चर इत्यादी यांना वेळोवेळी झालेल्या परीक्षेच्या संदर्भात सर्व बिले दिले आहे काय? | सद्य:स्थितीत महाविद्यालयाकडून मार्च/एप्रिल, २०२२ चे देयके सादर केल्यानंतर सदर देयके तपासून देण्याचे काम सुरु आहेत. तसेच काही महाविद्यालयाची देयके तपासून वित्त व लेखा विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेले आहे. |
| श्री. यतिराज होनमाने | | प्राचार्य डॉ. शिवाकुमार सुगण्णा गणपूर |
| १३ | श्रीमती सुनिता श्रीगांधी ह्या विद्यापीठामध्ये कोणत्या पदावर कार्यरत आहेत? | श्रीमती सुनिता श्रीगांधी ह्या विद्यापीठामध्ये कंत्राटी यंत्रणा विश्लेषक या पदावर कार्यरत आहेत. |
| १४ | श्रीमती सुनिता श्रीगांधी ह्या ज्या पदावर कार्यरत आहेत त्या पदाचे पात्रता निकष ते पूर्ण करतात का? | होय. |
| डॉ. शिरीष नागनाथ भोसले | | प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले |
| १५ | विद्यापीठातील सर्व विभाग व संकुले अनुदानित करण्यासाठी शासनाकडे काय पाठपुरावा करण्यात आला आहे? | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ परिसरात पाच संकुले १) रसायनशास्त्र संकुल २) पदार्थ विज्ञान संकुल ३) भूशास्त्र संकुल ४) सामाजिकशास्त्रे संकुल ५) संगणकशास्त्र संकुल ही पाच संकुले अनुदानित असून, त्या १७ अधिविभाग शासन मान्य आहेत. तर उर्वरित विभाग व संकुले अनुदानित व शासन मान्यतेसाठी सन २०२२ पासून शासनाकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला आहे. आपल्या सूलभ संदर्भासाठी सहपत्र १ ते ४८ जोडण्यात आले आहेत. |
| १६ | २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठातील किती अभ्यासक्रम बंद करण्यात आले आहेत? | २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठातील कोणतेही अभ्यासक्रम बंद करण्यात आले नाहीत. |
| श्री. सचिन मारुती गायकवाड | | डॉ. सिद्राम नारायण सलवदे |
| १७ | विद्यापीठामार्फत किती क्रिडा प्रकारचे प्रशिक्षण देऊन संबंधित स्पर्धाचे आयोजन केले जाते? | ३० क्रीडा प्रकाराचे विद्यापीठामार्फत प्रशिक्षण दिले जाते व या स्पर्धेचे आयोजन केले जाते. |
| १८ | खेलो India योजनेअंतर्गत आपल्या विद्यापीठास मंजूर झालेल्या Multipurpose Sports Complex बाबत सद्य:स्थिती काय आहे? | खेलो India योजनेअंतर्गत आपल्या विद्यापीठास मंजूर झालेल्या Multifurpose Sports Complex चे बांधकाम सुरु असून जोत्यापर्यंत काम पूर्णत्वास येत आहे. |

<table>
<tr><th>प्रश्न क्रमांक</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td colspan="2">श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे</td><td>सीए श्रेणिक हुकुमचंद शाह</td></tr>
<tr><td>१९</td><td>राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू असलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेतील गुणांबाबत काय तरतूद आहे?</td><td>अद्यादेश ४० मध्ये नमूद तरतूदीनुसार कार्यवाही केली जाते.</td></tr>
<tr><td>२०</td><td>विद्यापीठातील विविध बांधकाम प्रक्रियेमध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन निर्णय २९ जुलै, २०२१ ची अंमलबजावणी केली जाते काय?</td><td>नाही.</td></tr>
<tr><td colspan="2">ॲड उषा नंदकुमार पवार</td><td>प्राचार्य डॉ. शिवाकुमार सुगण्णा गणपूर</td></tr>
<tr><td>२१</td><td>विद्यापीठ परीक्षांचे निकाल Online जाहीर केल्यानंतर विद्यार्थ्यांना गुणपत्रके किती दिवसामध्ये दिली जातात?</td><td>निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना गुणपत्रके दिली जात नाहीत. तथापि, संबंधीत महाविद्यालयास निकाल जाहीर झाल्यापासून सात दिवसानंतर ते जास्तीत जास्त ३० दिवसापर्यंत गुणपत्रिका दिले जातात.</td></tr>
<tr><td colspan="2">डॉ. श्रीमती सीमा ए. गायकवाड</td><td>प्राचार्य डॉ. शिवाकुमार सुगण्णा गणपूर</td></tr>
<tr><td>२२</td><td>प्रस्तुत विद्यापीठामध्ये Ph.D. Course Work परीक्षेच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत संबधीत विद्यार्थ्यास दिली जाते काय?</td><td>विद्यापीठ अधिनियम ०.१०६ (B) २०१५ मधील अ.क्र.३ नुसार सद्यस्थितीत प्रस्तूत विद्यापीठामध्ये Ph.D. Course Work परीक्षेच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत संबंधीत विद्यार्थ्यास दिली जात नाही.</td></tr>
<tr><td>२३</td><td>प्रस्तुत विद्यापीठामध्ये Ph.D. Course Work परीक्षेच्या उत्तरपत्रीकेचे पुनर्मूल्यमापन करण्यासाठी संबंधीत विद्यार्थ्यांस अर्ज करता येतो काय?</td><td>विद्यापीठ अधिनियम ०.१०६ (B) २०२१५ मधील अ.क्र.३ नुसार सद्यस्थितीत Ph.D. Course Work परीक्षेच्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यमापन करण्यासाठी संबंधीत विद्यार्थ्यास अर्ज करण्याची तरतूद नाही.</td></tr>
<tr><td colspan="2">डॉ. सुशील कुमार शिंदे</td><td>प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले</td></tr>
<tr><td>२४</td><td>प्रस्तुत विद्यापीठामार्फत प्रत्येक वर्षी किती विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती दिली जाते?</td><td>प्रस्तूत विद्यापीठामार्फत प्रत्येक वर्षी "मुली शिकवा, समाज घडवा" या योजनेतून सोबत जोडलेल्या नियमावलीनुसार प्रत्येक संकुलातील कमीत-कमी एका विद्यार्थीनीला शिष्यवृत्तीचा लाभ दिला जातो.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>शैक्षणिक वर्ष</th><th>लाभार्थी विद्यार्थीनी संख्या</th><th>एकूण रु.</th></tr>
<tr><td>१</td><td>२०१६-१७</td><td>१४</td><td>२,३४,३९५/-</td></tr>
<tr><td>२</td><td>२०१७-१८</td><td>१७</td><td>२,९९,९८०/-</td></tr>
<tr><td>३</td><td>२०१८-१९</td><td>२०</td><td>३,४७,०००/-</td></tr>
<tr><td>४</td><td>२०१९-२०</td><td>३०</td><td>३,७०,०००/-</td></tr>
<tr><td>५</td><td>२०२०-२१</td><td>३६</td><td>३,६०,०००/-</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>२५</td><td>प्रस्तुत विद्यापीठामध्ये मागील शैक्षणिक वर्षी (२०२१-२२) कमवा व शिका योजनेचा लाभ किती विद्यार्थ्यांना देण्यात आला?</td><td>सन २०२१-२२ या वर्षात एकूण २६ विद्यार्थ्यांना कमवा व शिका योजनेचा लाभ देण्यात आला.</td></tr>
</table>

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| डॉ. मुल्ला जैनोद्दीन खतालसो | | प्राचार्य डॉ. शिवाकुमार सुगण्णा गणपूर |
| २६ | विद्यापीठ परीक्षा व विविध समित्यांच्या कामकाजाबाबतची देयके संबंधितांना किती दिवसात दिली जातात? | परीक्षा व विविध समित्यांच्या कामकाजाबाबतची देयके प्रस्तूत विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतर त्या देयकाची सखोल पडताळणी करुन देयके अदा करण्याबाबत लवकरात लवकर वित्त व लेखा विभागास पाठविण्यात येते. |
| २७ | शैक्षणिक वर्ष २०१७ ते २०२२ या कालावधीतील तक्रार निवारण समितीचे अहवाल अधिसभेपुढे किती वेळा सादर करण्यात आले? | अहवाल अधिसभेस सादर करण्यात आले नाहीत. |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

**विषय क्र. १४(१)** **प्रस्तुत विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र सुरु करणेसंदर्भात प्रस्तावाचा मसुदा तयार करणेकामी समिती गठीत करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र फॉर सोशल जस्टीस हे केंद्र सुरु करणेसंदर्भात श्री. सचिन शिंदे, अध्यक्ष, प्रयास मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्था, सोलापूर यांनी दि.१४/०६/२०२१ रोजीच्या निवेदनान्वये मागणी केली आहे. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाही मूल्याधिष्टीत सामाजिक पुर्नरचनेतील जीवनदृष्टी केंद्रस्थानी ठेऊन, सामाजिक न्याय व मानवविद्या या अभ्यासक्षेत्रासाठी मार्गदर्शक ठरतील अशी ध्येय धोरणे आणि विकासाची दिशा या संदर्भात संशोधनावर लक्ष केंद्रीत व्हावे, त्यादृष्टीने राज्यातील तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन केंद्राशी जोडून विविध पदव्युत्तर व प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबवावेत, आंबेडकरी विचार व तत्वज्ञान या विषयात एम.ए. व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाबरोबर "डेव्हलपमेंट स्टडीज ॲण्ड सोशल पॉलीसी" आणि बुध्दीस्ट स्टडीज या विषयात सुध्दा एम.ए. करण्याची सुवर्णसंधी विद्यार्थ्यांना मिळावी, विविध सामाजिकशास्त्रे आणि मानवविद्या आदी विषयात ही आंतरशाखीय संशोधनाची संधी उपलब्ध करुन देत आंतरराष्ट्रीय स्तरावरील उत्तम दर्जाचे संशोधन केंद्र या विद्यापीठात उभारण्यात यावे.

तसेच लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या दक्षिण आशियायी केंद्रातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्हिजिटींग फेलो या उपक्रमामार्फत एकत्रितपणे आंतरराष्ट्रीय कार्यशाळा, परिषदा, चर्चासत्रांचे आयोजन तसेच विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी संशोधन शिष्यवृत्ती असे उपक्रम राबवावे अशी विनंती केली आहे.

सबब, उक्तबाबीचा व इतर अनुषंगिक दस्ताऐवजांचा सर्वकष अभ्यास करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्राचा प्रस्तावाचा मसुदा तयार करणेकामी समिती गठीत करण्याची बाब विचारार्थ.

| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र सुरु करणेसंदर्भात प्रस्तावाचा मसुदा तयार करणेकामी मा. कुलगुरु महोदयांना समिती गठीत करण्याचे अधिकार देण्याचे सर्वानुमते ठरले.** |
|---|---|

| विषय क्र. १४(२) | **भूशास्त्र संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि केलनिया विद्यापीठ, केलनिया श्रीलंका यांच्यातील सामंजस्य करार करण्याची बाब विचारार्थ.** |
|---|---|

टिपणी: भूशास्त्र संकुल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि केलनिया विद्यापीठ, केलनिया, श्रीलंका, महाराष्ट्र भूगोल परिषद व पंजिया जॉग्रफिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २३ ते २६ फेब्रुवारी, २०२३ दरम्यान श्रीलंका येथे आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात येणार आहे.

केलनिया विद्यापीठातील भूगोल विभाग आणि प्रस्तुत विद्यापीठातील भूशास्त्र संकुल यांच्यामध्ये जर सामंजस्य करार झा़ला तर याचा फायदा विद्यापीठ तसेच संकुलातील विद्यार्थी, संशोधन करणारे विद्यार्थी तसेच शिक्षक यांना होणार आहे. या संकुलामधील पर्यावरणशास्त्र विभाग व भूमाहितीशास्त्र विभाग व भूगर्भशास्त्र विभागांना आणि त्यांच्या विद्यार्थ्यांना याचा जास्तीत जास्त फायदा होणार आहे.

सबब, उपरोक्तप्रमाणे सामंजस्य करार करण्याची बाब विचारार्थ तसेच सोलापूर ते हैद्राबाद ते श्रीलंका जाणे व येणे विमान खर्च व व्हिसा व श्रीलंका येथे तीन दिवसासाठीचा होणारा हॉटेल खर्चाची बाब विचारार्थ.

| ठराव: | भूशास्त्र संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि केलनिया विद्यापीठ, केलनिया श्रीलंका यांच्याशी सामंजस्य करार करण्यास तसेच सोलापूर ते हैद्राबाद ते श्रीलंका जाणे व येणे विमान खर्च व व्हिसा व श्रीलंका येथे तीन दिवसासाठी होणाऱ्या हॉटेल खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
|---|---|

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| | |
|---|---|
| विषय क्र. १४(३) | **मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांचे दि.०४/१०/२०२२ रोजीचे पत्रान्वये श्री. रोहित रेळेकर, श्री. नागनाथ पाटील व श्री. मल्हारी लाले या तीन कंत्राटी संगणक लेखनिक यांना कुशल या प्रकारातुन एकत्रित वेतनावर घेण्याबाबत विद्यापीठ कार्यालयास केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |

टिपणी: मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. औरंगाबाद यांनी श्री. रोहित रेळेकर, श्री. नागनाथ पाटील व श्री. मल्हारी लाले यांच्या दि.०४/१०/२०२२ रोजीच्या विनंती अर्जान्वये वाढती महागाईमुळे वेतनवाढ करण्याबाबत विनंती अर्जास अनुसरुन त्यांना कुशल या प्रकारातुन एकत्रित वेतनावर घेण्याबाबत विद्यापीठ कार्यालयास केलेली शिफारस केलेली आहे. त्यानुसार त्यांच्या सद्य:स्थितीच्या वेतनाचा व त्यांनी मागणी केलेल्या वेतनाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव | प्रकार व पदनाम | सद्यस्थितीचे वेतन | मागणी केलेले वाढीव वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. रेळेकर रोहित बाळकृष्ण | कुशल - संगणक लेखनिक | प्रतिदिन वेतन ₹५२८.३८/- | ₹२५,०००/- |
| २. | श्री. पाटील नागनाथ नामदेव | | | ₹२५,०००/- |
| ३. | श्री. लाले मल्हारी तानाजी | | | ₹२५,०००/- |

वरील संदर्भीय अर्जाच्या छायांकित प्रती सदर पत्रासोबत जोडून त्यांची वेतनवाढ हे कुशल या प्रकारातून एकत्रित वेतनावर घेण्याबाबत आपणास शिफारस करण्यात येत आहे असे कळविलेले आहे.

परंतु, मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांच्याकडून मनुष्यबळाची घेण्यात येणारी सेवा दि.२९/१०/२०२२ पासून विद्यापीठ कार्यालयाच्या दि.२१/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये समाप्त करण्यात आलेली आहे. तसेच सद्य:स्थितीत मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि., नागपूर यांच्याकडून दि.२१/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये पुरवठा आदेश देवुन विविध पदनामाचे मनुष्यबळ पुरविण्याबाबत कळविण्यात आलेले आहे व सद्य:स्थितीत मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि., नागपूर हे विद्यापीठास मनुष्यबळ पुरवठा करीत आहेत.

सबब, मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांचे दि.०४/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये श्री. रोहित रेळेकर, श्री. नागनाथ पाटील व श्री. मल्हारी लाले या तीन कंत्राटी संगणक लेखनिक यांना कुशल या प्रकारातुन एकत्रित वेतनावर घेण्याबाबत विद्यापीठ कार्यालयास केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **मे. ॲक्युरेक्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि., औरंगाबाद यांनी दि.०४/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये खालील कंत्राटी संगणक लेखनिक यांना कुशल या प्रकारातून एकत्रित वेतनावर घेण्यास केलेली शिफारस स्विकारुन मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि., नागपूर या मनुष्यबळ पुरवठादारामार्फत माहे जानेवारी, २०२३ पासून प्रतिदिन ₹५२८.३८ ऐवजी खालीलप्रमाणे एकत्रित वेतन देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

| अ.क्र. | नाव | एकत्रित वेतन |
|---|---|---|
| १) | श्री. रेळेकर रोहित बाळकृष्ण | ₹१८,०००/- |
| २) | श्री. पाटील नागनाथ नामदेव | ₹१८,०००/- |
| ३) | श्री. लाले मल्हारी तानाजी | ₹१८,०००/- |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय क्र. १४(४)** **संलग्नित महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक या पदावर सरळसेवेने व पदोन्नतीने नव्याने नियुक्त झालेल्या व रुजू झालेल्या शिक्षकांचे, तसेच संस्था अंतर्गत बदलीने नियुक्त प्राचार्यांचे व शिक्षकांचे चेंजिस इन स्टाफ मान्यतेसाठी प्राप्त प्रस्तावावर समितीने केलेली शिफारस विचारार्थ.**

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातून विहीत मुदतीत चेंजेस इन स्टाफचे प्रस्ताव मागणी केले होते. प्राप्त प्रस्तावांची पडताळणी करीता समितीच्या सहा बैठका दि.१८ व १९ ऑक्टोबर, २०२२, दि. ०६ ते ०८ डिसेंबर, २०२२ व दि.२३ डिसेंबर, २०२२ रोजी वेळोवेळी संपन्न झालेल्या आहेत.

सदर समितीसमोर महाविद्यालयामार्फत प्राप्त एकूण ३२४ उमेदवारांचे प्रस्तावानुसार सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक या पदावर सरळसेवेने व पदोन्नतीने नव्याने नियुक्त झालेल्या व रुजू झालेल्या शिक्षकांचे, तसेच संस्था अंतर्गत बदलीने नियुक्त प्राचार्यांचे व शिक्षकांचे चेंजेस इन स्टाफ समितीने केलेल्या शिफारसी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | संलग्नित महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक या पदावर सरळसेवेने व पदोन्नतीने नव्याने नियुक्त झालेल्या व रुजू झालेल्या शिक्षकांचे, तसेच संस्था अंतर्गत बदलीने नियुक्त प्राचार्यांचे व शिक्षकांचे चेंजिस इन स्टाफ मान्यतेसाठी प्राप्त प्रस्तावावर समितीने केलेल्या शिफारसी स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| विषय क्र. १४(५) | **प्राचार्य डॉ. खिलारे चंद्रकांत जगन्नाथ यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नीत संस्थेच्या एस. एम. जोशी कॉलेज, हडपसर या महाविद्यालयातून कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपुर येथे बदली झाल्याने त्यांच्या प्राचार्य पदाच्या चेंजेस इन स्टाफचा प्रस्तावास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार मा. कुलगुरु महोदयांनी त्यांना प्राप्त अधिकारातील कलम १२(७) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेली मान्यता माहितीस्तव.** |
|---|---|

टिपणी: मा. सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा. यांचा जा. क्र. हसप./१७४१९, दि.२६/०८/२०२२ रोजीचा अर्ज अवलोकनार्थ सादर.

प्राचार्य डॉ. खिलारे चंद्रकांत जगन्नाथ यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नीत संस्थेच्या एस. एम. जोशी कॉलेज, हडपसर या महाविद्यालयातुन कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपुर येथे प्रशासकीय कारणास्तव बदली झाली असुन प्राचार्य डॉ. खिलारे चंद्रकांत जगन्नाथ हे दि. १९/०८/२०२२ रोजी सदर महाविद्यालयात हजर झालेले आहेत. प्राचार्य डॉ. खिलारे चंद्रकांत जगन्नाथ यांचा चेंजेस इन स्टाफचा अर्ज विद्यापीठाकडे सादर केला असुन सदर महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतनाचे प्रस्ताव प्राचार्य यांचे सहीने मा. विभागीय सहसंचालक कार्यालयाकडे पाठविण्यात येतात. त्यामुळे त्यांना चेंजेस इन स्टाफची मान्यता न झाल्यास त्या सर्वाचे वेतन होण्यास विलंब होणार असल्याने चेंजेस इन स्टाफची मान्यता देण्याबाबत मा. सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी वरिष्ठाकडे तोडी विनंती केली आहे. त्यानुसार सदरची चेंजेस इन स्टाफची मान्यता देणे आवश्यक आहे.

सबब, प्राचार्य डॉ. खिलारे चंद्रकांत जगन्नाथ यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नीत संस्थेच्या एस. एम. जोशी कॉलेज, हडपसर या महाविद्यालयातुन कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपुर येथे बदली झाल्याने त्यांच्या प्राचार्य पदाच्या चेंजेस इन स्टाफचा प्रस्तावास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतुदीनुसार मा. कुलगुरु महोदयांनी त्यांना प्राप्त अधिकारातील कलम १२(७) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेली मान्यता माहितीस्तव.

| ठराव: | **प्राचार्य डॉ. खिलारे चंद्रकांत जगन्नाथ यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नीत संस्थेच्या एस. एम. जोशी कॉलेज, हडपसर या महाविद्यालयातून कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपुर येथे बदली झाल्याने त्यांच्या प्राचार्य पदाच्या चेंजेस इन स्टाफ प्रस्तावास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) नुसार मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.** |
|---|---|

| विषय क्र. १४(६) | विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयाकडून विद्यार्थी प्रवेशावेळी घेण्यात येणारे प्रो-रेटा शुल्क स्वायत्त महाविद्यालयांकडून सुध्दा स्विकारण्याची बाब विचारार्थ |
|---|---|

| ठराव: | विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयाकडून विद्यार्थी प्रवेशावेळी घेण्यात येणारे प्रो-रेटा शुल्क स्वायत्त महाविद्यालयांकडून सुध्दा नियमानुसार स्विकारण्याबाबत निर्णय घेण्यापूर्वी इतर विद्यापीठांकडून माहिती घेऊन सदरचा विषय पुढील बैठकीत सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. |
|---|---|

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

M. Fadnavis 17.1.23
अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद